महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ००४.

लोकाभिमुख प्रशासन नागरी सनद व माहिती पुस्तिका

# नागरिकांची सनद

# प्रस्तावना

महाराष्ट्र राज्य आणि भारतातील सर्व राज्यांच्या आर्थिक विकासात प्राथमिक व माध्यमिक शिक्षणास अत्यंत महत्त्वाचे स्थान आहे. तळागाळातील, ग्रामीण/डोंगरी, अतिदुर्गम मागास भागातील विकास कार्यक्रम राबवण्यासाठी आवश्यक असणाऱ्या प्रशिक्षित प्राथमिक शिक्षकांना आवश्यक ते मार्गदर्शन करून, त्यांना सक्षम करून, मनुष्यबळ वाढवून आपल्या पाल्यास शाळेत पाठवण्यास उद्युक्त करून, त्यांच्यात मानसिक बळ निर्माण करण्याचे शिक्षण हे मुख्य साधन आहे. देशाच्या सामाजिक व आर्थिक विकासातील प्राथमिक शिक्षणाची महत्त्वाची भूमिका लक्षात घेऊन प्राथमिक स्तरावरील शिक्षणविषयक कार्यक्रम सर्वांपर्यंत पोहचवले जाणे अत्यंत महत्त्वाचे आहे. शिक्षणाचे महत्त्व लक्षात घेऊनच महाराष्ट्र राज्य शासनाचा शालेय शिक्षण विभाग आपल्या एकूण वित्तीय महसूल खर्चापैकी साधारणपणे $\frac{१}{५}$ भाग सर्वसाधारणपणे प्राथमिक तथा माध्यमिक शिक्षणावर खर्च करते.

शालेय शिक्षण विभागामार्फत राज्यातील विविध शैक्षणिक योजनांची आखणी, प्राथमिक शिक्षणाचे सार्वत्रीकरण, वय वर्षे ६ ते १४ या वयोगटाच्या सर्व मुलां-मुलींना शिक्षणासाठीची सर्व भाषांतील इयत्ता पहिली ते आठवी या इयत्तांची एकूण आठ भाषांतील क्रमिक पुस्तके तयार करून, तसेच इयत्ता ९ वी ते १२ वी या इयत्तांच्या महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाच्या पुस्तकांची छपाई करून ती उपलब्ध करून वेळेत पुरवण्याचे शासनाचे घटनात्मक दायित्व आणि राज्याचे धोरण इत्यादी मार्गदर्शक तत्त्वे समोर ठेवून करण्यात आली आहे. पूर्वप्राथमिक शिक्षण स्तराचा यामध्ये समावेश होतो. या प्रत्येक स्तरावर आवश्यक त्या सर्व पायाभूत सोई उपलब्ध करणे, मानवी घटक आर्थिकदृष्ट्या सबळ करणे आणि जीवनाचा दर्जा वाढवणे यांना प्राथमिक शिक्षणामध्ये प्राधान्य आहे.

# महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,
## 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे - ४११ ००४.

### १. मंडळाची स्थापना

कोठारी आयोगाच्या शिफारशींनुसार महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळाची स्थापना २७ जानेवारी, १९६७ रोजी झाली. शासनमान्य अभ्यासक्रमावर आधारित प्राथमिक शिक्षणाच्या स्तरावरील इयत्ता पहिली ते आठवी या इयत्तांसाठी आवश्यक ती पाठ्यपुस्तके, तसेच अन्य शैक्षणिक साहित्य राज्यात सर्वांकरिता प्रकाशित करणे, हे मंडळाचे मुख्य उद्दिष्ट आहे. याव्यतिरिक्त महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळाने तयार केलेल्या माध्यमिक स्तरावरील इयत्ता ९ वी ते १२ वी या इयत्तांच्या पाठ्यपुस्तकांची छपाई, तसेच त्यांचे वितरण हे कामही मंडळाकडे आहे.

पाठ्यपुस्तक मंडळाची स्थापना होण्यापूर्वी पाठ्यपुस्तके तयार करण्याचे काम प्रामुख्याने खासगी प्रकाशकांच्या द्वारे होत असे; परंतु कोठारी आयोगाच्या सर्व शिफारशी महाराष्ट्र शासनाने स्वीकारल्यानंतर या कामासाठी देशात विशेष स्वायत्त संस्था स्थापन व्हाव्या, हा विचार पुढे आला. या विचारातून महाराष्ट्र राज्यात ***'महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ'*** ही स्वायत्त संस्था दिनांक २७ जानेवारी, १९६७ रोजी स्थापन करण्यात आली व 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ००४ येथे मुख्यालय ठेवण्यात येऊन या संस्थेची नोंदणी संस्था नोंदणी अधिनियम १८६० व पब्लिक ट्रस्ट ॲक्ट १९५० अनुसार करण्यात आली आहे. मंडळाचे कामकाज **'ना नफा ना तोटा'** या तत्त्वावर चालते.

### २. मंडळाची प्रमुख उद्दिष्टे

(१) सर्वसामान्यपणे शिक्षणाच्या विकासासाठी व विशेषतः शालेय शिक्षणाच्या अभिवृद्धीसाठी साहाय्य व उत्तेजन देणे.

(२) शालेय पाठ्यपुस्तके, शिक्षकांकरिता हस्तपुस्तिका, मार्गदर्शिका व विद्यार्थ्यांसाठी स्वाध्याय पुस्तिका यांसारख्या शैक्षणिक साहित्याची निर्मिती करणे. त्याचप्रमाणे अध्ययन व अध्यापन प्रगत होण्याच्या दृष्टीने उपयुक्त असे अन्य शैक्षणिक साहित्य तयार करणे.

(३) मंडळाने तयार केलेली पाठ्यपुस्तके व इतर शैक्षणिक साहित्य यांची छपाई करून ती प्रकाशित करणे व त्यांचा साठा, वितरण व विक्री यांची व्यवस्था करणे.

(४) शिक्षणाचा दर्जा सुधारण्याच्या दृष्टीने अभ्यासक्रमासंबंधी व पाठ्यपुस्तकांसंबंधी हाती घेतल्या जाणाऱ्या संशोधन प्रकल्पांना अनुदान देऊन साहाय्य करणे व मार्गदर्शन करणे.

(५) शासनाच्या शैक्षणिक ध्येय-धोरणांच्या परिपूर्ततेसाठी आवश्यक ते उपक्रम राबवणे.

### ३. पाठ्यपुस्तक मंडळाचे व्यवस्थापन

महाराष्ट्र राज्याचे **माननीय शालेय शिक्षणमंत्री** हे मंडळाचे पदसिद्ध अध्यक्ष व **माननीय राज्यमंत्री, शालेय शिक्षण** हे पदसिद्ध उपाध्यक्ष असतात. शिक्षण विभागातील शिक्षण संचालक या पदाशी समकक्ष असणारे एक अधिकारी हे मंडळाचे संचालक असतात. मंडळाच्या सर्व व्यवहारांचे संपूर्ण व्यवस्थापन **नियामक मंडळाकडे** सोपवण्यात आले आहे. मंडळ हे व्यवस्थापनाचे कार्य समयलेखातील तरतुदींनुसार पार पाडत असते.

नियामक मंडळास साहाय्य करण्याकरिता मंडळाच्या संस्थापन समयलेखाप्रमाणे पुढील साहाय्यक समित्या स्थापित करण्यात आलेल्या आहेत.

(१) विद्या परिषद

(२) अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तक संशोधन सल्लागार परिषद

(३) पाठ्यपुस्तक निर्मिती व वितरण परिषद

(४) वित्त समिती

(५) कार्यकारी समिती

नियामक मंडळ व या सर्व समित्या संस्थापन समयलेखात विहित केल्याप्रमाणे कार्ये व कर्तव्ये पार पाडतात.

## ४. मंडळाची प्रशासकीय रचना

मंडळाचे मुख्य कार्यालय, विभागीय कार्यालय व भांडारांमध्ये कायम स्वरूपी अधिकारी व कर्मचारी आहेत. मंडळाचे संचालक हे शिक्षण विभागातून परसेवेवर आलेले संचालक दर्जाचे अधिकारी असून ते मंडळाचे कार्यकारी अधिकारी आहेत. वित्त व लेखा अधिकारी व अंतर्गत लेखा परीक्षण अधिकारी हे महालेखाकार कार्यालयातून परसेवेवर आलेले अधिकारी असतात.

मंडळाचे कामकाज चालवण्याच्या दृष्टीने पाठ्यपुस्तक मंडळात पुढील विविध विभाग कार्यरत आहेत.

- विद्या विभाग, पुणे.
- निर्मिती विभाग, मुंबई.
- प्रशासन विभाग, पुणे.
- विधी व माहिती विभाग, पुणे.
- स्थावर विभाग, पुणे.
- अंतर्गत लेखा परीक्षण विभाग, पुणे.
- संशोधन विभाग, पुणे.
- वितरण विभाग, पुणे.
- संगणक विभाग, पुणे.
- ग्रंथालय विभाग, पुणे.
- ‘किशोर’ विभाग, पुणे.

## ५. विद्या विभाग

प्राथमिक स्तरावरील म्हणजेच इयत्ता पहिली ते आठवीची पाठ्यपुस्तक निर्मिती हे मंडळाचे एक प्रधान उद्दिष्ट आहे. ही पाठ्यपुस्तके, तसेच इतर आनुषंगिक शैक्षणिक साहित्य तयार करण्याचे काम मंडळाच्या विद्या विभागातील भाषा व भाषेतर विभागांमार्फत करण्यात येते.

**भाषा विभागात** : मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, गुजराती, सिंधी, कन्नड, तेलुगु या आठ भाषा माध्यमातील पुस्तके तयार केली जातात.

**भाषेतर विभागात :** गणित, शास्त्र, इतिहास, नागरिकशास्त्र, भूगोल या विषयांची पाठ्यपुस्तके तयार केली जातात. कला, कार्यानुभव, आरोग्य व शारीरिक शिक्षण या तीन

विषयांसाठी पाठ्यपुस्तके निर्धारित केलेली नाहीत. तथापि या विषयांचे अध्ययन अध्यापन प्रभावीपणे व्हावे यादृष्टीने त्यासाठी शिक्षक हस्तपुस्तिका/मार्गदर्शिका तयार करण्यात येतात.

**(अ) प्रकाशनपूर्व प्रक्रिया :** शासनमान्य अभ्यासक्रमावर आधारित भाषा व भाषेतर विषयांची पाठ्यपुस्तके व अनुषंगिक साहित्य मंडळ तयार करते. पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त शिक्षक स्वाध्यायपुस्तिका, शिक्षक हस्तपुस्तिका व शिक्षणोपयोगी पूरक साहित्याची निर्मितीही करण्यात येते. पाठ्यपुस्तके तसेच इतर शैक्षणिक साहित्य तयार करण्यासाठी राज्याच्या विविध भागांतील व विविध स्तरांवर काम करणारे शिक्षक, शिक्षणतज्ज्ञ, विषयतज्ज्ञ, लेखक इत्यादींची मदत घेण्यात येते. पाठ्यपुस्तके निर्दोष व दर्जेदार व्हावीत याकरता त्यांच्या चाचणी प्रती तयार झाल्यानंतर त्या चाचणी प्रतींचे समीक्षण व गुणवत्ता परीक्षण करुन घेतले जाते. तसेच आवश्यकतेनुसार त्यातील निवडक भागांची शाळेत जाऊनही चाचणी केली जाते.

त्या त्या भाषा माध्यमाची गरज लक्षात घेऊन भाषा विषयांची सर्व पुस्तके स्वतंत्रपणे विकसित केली जातात. भाषेतर विषयांची पाठ्यपुस्तके प्रथम मराठीत तयार केली जातात. नंतर संबंधित भाषा विभागांत त्यांचे त्या त्या भाषेत भाषांतर करुन घेण्यात येते. ही भाषांतरित पुस्तके अंतिम करण्यापूर्वी त्यांचेही समीक्षण व गुणवत्ता परीक्षण केले जाते. सर्व भाषा माध्यमांतील भाषेतर पुस्तकांचा आशय सारखाच असतो.

**(ब)** पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीबरोबरच **पाठ्येतर साहित्याची** निर्मिती मंडळ करते. त्यामध्ये शब्दकोश, कथा, कविता, संदर्भकोष, माहितीपर पूरक साहित्य अशा विविध बाबींचा समावेश आहे.

## ६. निर्मिती विभाग

पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीचे काम पाहणारे मंडळाचे कार्यालय प्रभादेवी, मुंबई येथे आहे. निर्मिती विभागाचे प्रमुख म्हणून नियंत्रक हे काम पाहतात.

विद्या विभागाकडून पाठ्यपुस्तकांची अंतिम मुद्रणप्रत प्राप्त झाल्यानंतर पुस्तक निर्मितीच्या सर्व प्रक्रिया करून घेणे व पुरेशा तयार प्रती विक्रीस उपलब्ध करून देणे, तसेच पुनर्मुद्रणाची पुस्तके विक्रीस उपलब्ध करून देणे हे निर्मिती विभागाच्या कामाचे स्थूल स्वरूप आहे. पुस्तक निर्मितीमध्ये अनेक प्रक्रिया कराव्या लागतात.

पुस्तक निर्मितीची पहिली प्रक्रिया म्हणजे मुद्रणप्रतीवर तांत्रिक स्वरूपाच्या सूचना देणे. त्यामध्ये प्रामुख्याने मजकुराच्या टाईपाचा प्रकार व त्याचा आकार; पाठांच्या तसेच परिच्छेदांच्या शीर्षकांचा टाईप इत्यादी गोष्टींचा समावेश असतो. अशी सूचना दिलेली मुद्रणप्रत संगणकावर जुळणी करण्याकरिता पाठवण्यात येते. पाठ्यपुस्तक मंडळ प्रकाशित करत असलेल्या आठ माध्यमांपैकी उर्दू, सिंधी व तेलुगू या माध्यमांव्यतिरिक्त इतर सर्व भाषांतील पुस्तकांच्या मजकुराची जुळणी मंडळाच्या संगणक विभागात करण्यात येते व उर्दू, सिंधी व तेलुगू या भाषेतील पुस्तकांच्या मजकुराची जुळणी मंडळाने मान्य केलेल्या खासगी व्यावसायिकांकडून करुन घेण्यात येते. जुळणी झाल्यानंतर मुद्रितांची मुद्रितशोधन विभागाकडून प्रथम तपासणी होते. तपासणीनंतर त्यातील दुरुस्त्या सुधारून द्वितीय तपासणी होते. नंतर त्यात चित्राकृती, आकृत्या, नकाशे असल्यास त्या समाविष्ट करून पृष्ठरचना करण्यात येते. त्यांची मुद्रिते पुन्हा तपासण्यात येतात. पुस्तकात कोणत्याही स्वरूपाची चूक राहू नये म्हणून मुद्रिते साधारणपणे ३-४ वेळा तपासण्यात येतात. सुधारित मुद्रितांमध्ये दुरुस्त्यांचे प्रमाण अत्यंत अल्प असल्याची खात्री झाल्यानंतर सदर

दुरुस्त्या सुधारून अंतिम मजकूर चित्राकृतीसह व मुखपृष्ठ पॉझिटिव्हज् तयार करण्याकरिता प्रोसेसर्सकडे पाठवण्यात येतात. या पॉझिटिव्हज्वरून छपाई यंत्रावर मुद्रिते तयार करुन मुखपृष्ठासह बांधणी केलेली अंतिम नमुना प्रत पुनश्च तपासण्यात येते आणि त्यामध्येही काही चूका आढळल्यास त्या दुरुस्त करुन अंतिम छपाई बांधणी करण्यात येते.

पाठ्यपुस्तकांच्या छपाई–बांधणीचे काम अखिल भारतीय स्तरावरून जाहीर निविदा मागवण्यात येऊन निविदापात्र ठरणाऱ्या देशभरातील सुमारे २२५ मुद्रकांकडून करून घेण्यात येते. या मुद्रणालयांकडून छपाई–बांधणी झालेली पुस्तके मंडळाच्या भांडारात पुरवठा झाल्यानंतर त्या प्राप्त झालेल्या पुस्तकांची निर्मिती विभागामार्फत तांत्रिकदृष्ट्या तपासणी केली जाते. या तपासणीमध्ये छपाई–बांधणीच्या दृष्टीने सदोष पुस्तके आढळून आल्यास ती वेगळी केली जातात व निर्दोष पुस्तके विक्रीसाठी उपलब्ध करण्यात येतात.

मंडळाची बहुतांश पुस्तके ही 'ए–५' या मेट्रिक आकारात असतात. तसेच ती मराठी, उर्दु, इंग्रजी, हिंदी, गुजराती, कन्नड, तेलुगु व सिंधी या आठ भाषांमध्ये छापण्यात येतात. प्रतिवर्षी मंडळाला सुमारे ६०० शीर्षकांच्या सरासरीने १३ कोटी प्रती छापाव्या लागतात. ही पाठ्यपुस्तके वेळेत व किफायतशीर किमतीत उपलब्ध करून दिली जातात.

## ७. संशोधन विभाग

पाठ्यपुस्तक मंडळाच्या नामाभिधानात नमूद केल्याप्रमाणे अभ्यासक्रम व पाठ्यपुस्तक यांच्याशी संबंधित विषयावर संशोधन प्रकल्पाचे काम हाती घेतले जाते. यासाठी पाठ्यपुस्तक मंडळात स्वतंत्र संशोधन विभाग आहे. मंडळाच्या संस्थापन समयलेखातील तरतुदींनुसार संशोधन सल्लागार परिषद, तसेच या परिषदेची प्रकल्प समिती काम करते.

राज्यात संशोधनाचे वातावरण निर्माण व्हावे, पाठ्यपुस्तक मंडळालाही संशोधन प्रकल्पांचा उपयोग शैक्षणिक साहित्य निर्मितीमध्ये करून घेता यावा याकरिता पाठ्यपुस्तक मंडळाने 'संशोधन प्रकल्प आर्थिक साह्य योजना' तयार केली आहे. या योजनेची कार्यवाही १९७० पासून सुरू आहे. या योजनेंतर्गत विविध प्रकल्प हाती घेण्यात येतात. एकूण ८९३ संशोधन प्रकल्प पूर्ण झालेले आहेत. प्राथमिक शिक्षक, माध्यमिक शिक्षक, महाविद्यालयीन शिक्षक, शिक्षक प्रशिक्षक यांना संशोधन प्रकल्प घेतात येतात. प्रत्येक प्रकल्पासाठी वैयक्तिक स्तरावर व संस्था स्तरावर अनुदान देण्यात येते. प्रकल्पकांना व मार्गदर्शकांना प्रकल्प पूर्ण केल्यानंतर मानधन देण्यात येते. सध्या २००८–०९ संशोधन कार्यक्रमांतर्गत ३२ प्रकल्पांची कार्यवाही सुरू आहे.

## ८. पाठ्यपुस्तकांचे वितरण

प्राथमिक, माध्यमिक, तसेच उच्च माध्यमिक स्तरांवरील प्रत्येक विषयाचे पुस्तक आठ माध्यमांतून छापले जाते. इयत्ता पहिली ते आठवीची ५३८ शीर्षके, इयत्ता ९ वी व १० वीची २५८ शीर्षके व इयत्ता ११ वी व १२ वीची भाषा/भाषेतर विषयाची ७० शीर्षके व इयत्ता पहिली ते आठवीच्या स्वाध्यायपुस्तिकांची ६४ शीर्षके अशी एकूण ९३० शीर्षके आहेत. या सर्व पाठ्यपुस्तकांची छपाई झाल्यानंतर ती राज्यात वेळेत वितरित करणे हे कामही मंडळाला मोठ्या प्रमाणावर पार पाडावे लागते. तसेच पाठ्येतर पुस्तकांमध्ये प्रत्येक इयत्तांच्या (इयत्ता पहिली ते आठवी) शिक्षक हस्तपुस्तिका व विद्यार्थी, पालक व शिक्षक यांच्याकरिता इतर पुस्तकांचीही मंडळाच्या भांडारांतून विक्री केली जाते. पाठ्येतर पुस्तकांवर २०% वटाव दिला जातो. मंडळनिर्मित पुस्तकांच्या वितरणाची आकडेवारी पाहिली, की या कामाची व्याप्ती लक्षात येईल.

शालेय वर्ष २०१७-२०१८ साठी पाठ्यपुस्तके/स्वाध्यायपुस्तिका सुमारे सोळा कोटी प्रतींच्या मुद्रण-पुनर्मुद्रणाचा कार्यक्रम हाती घेण्यात आला आहे. ही पुस्तके पुढील शैक्षणिक वर्ष (२०१७-२०१८) सुरू होण्यापूर्वी विद्यार्थ्यांना उपलब्ध करून दिली जातील.

पाठ्यपुस्तकांच्या वितरणाचे काम योजनाबद्ध रीतीने आणि कार्यक्षम पद्धतीने व्हावे यासाठी मंडळाने सुरुवातीपासून वितरणाची एक निश्चित अशी पद्धत आखली आहे.

प्रत्येक शैक्षणिक वर्षाकरिता छापून आलेली पुस्तके मुद्रणालयातून जवळच्या मंडळाच्या भांडारात पोहचवली जातात. नंतर ती मंडळाच्या इतर भांडारांत गरजेनुसार पाठवली जातात. मुंबई (गोरेगाव), पुणे, नागपूर, औरंगाबाद, नाशिक, कोल्हापूर, लातूर, अमरावती आणि पनवेल या ठिकाणी मंडळाची विभागीय भांडारे आहेत. राज्यात सर्वत्र पुस्तके वेळेवर उपलब्ध व्हावी, यासाठी पुस्तकांच्या विक्री आणि वितरणाच्या विकेंद्रीकरणाचे धोरण मंडळाने १९७४ पासून स्वीकारले आहे. त्याचा एक भाग म्हणून बृहन्मुंबईतील 'सुपारीबाग मध्यवर्ती सहकारी ग्राहक संघ मर्यादित' आणि ठाणे जिल्ह्यातील 'श्री समर्थ को. ऑप. कंझ्यु. स्टोअर्स' या सहकारी संस्थांमार्फतही पुस्तकांचे वितरण करण्याचे प्रस्तावित आहे. पाठ्यपुस्तकाच्या वितरणासाठी मंडळाची एकूण ९ प्रमुख भांडारे असून वर नमूद केलेल्या दोन सहकारी वितरकांमार्फतही वर्षभर पुस्तकांचे वितरण केले जाते. मंडळाच्या वरील अकरा वितरण केंद्रांतून अधिकृत पुस्तक विक्रेते, शैक्षणिक संस्था पाठ्यपुस्तकांची मागणी नोंदवतात व या पाठ्यपुस्तकांची खरेदी करतात. अशा रीतीने या अधिकृत विक्रेत्यांमार्फत पाठ्यपुस्तकांचे वितरण होत असते. **महाराष्ट्रात मंडळाचे सुमारे ७२४ अधिकृत पुस्तक विक्रेते आहेत.**

पुस्तकांच्या विक्री व वितरणासाठी मंडळाची स्वतंत्र नियमावली आहे. त्यानुसार राज्यातील कोणत्याही अधिकृत पुस्तक विक्रेत्यास **अधिकृत पुस्तक विक्रेता** म्हणून नाममात्र नोंदणी शुल्क मंडळाकडे जमा करून व अनामत रक्कम भरून मंडळाकडे प्रत्येक वर्षाच्या मार्चपर्यंत नोंदणी करता येते. पुस्तक विक्रेत्यांना पुस्तकांच्या खरेदीवर **मंडळ १५ टक्के वटाव** देते. पाठ्यपुस्तकाचे **थेट पद्धतीने** देखील वितरण व्हावे, यासाठी राज्यातील **शैक्षणिक संस्थांना** मंडळाच्या ९ विभागीय भांडारातूनही पुस्तकांची खरेदी करण्यासाठी व्यवस्था उपलब्ध करून देण्यात आली आहे. त्यासाठी नाममात्र नोंदणी शुल्क जमा करून या संस्थांना पाठ्यपुस्तकांचा पुरवठा अग्रक्रमाने करण्यात येतो. तसेच त्यांना पाठ्यपुस्तकांच्या किमतीवर **१५ टक्के वटाव**ही देण्यात येतो. **राज्यातील सुमारे ६३३ शैक्षणिक संस्थांनी मंडळाच्या नऊ विभागीय भांडारांमध्ये नोंदणी केली आहे.**

वितरणाचे काम प्रचंड असून ते कालमर्यादेच्या बंधनात करावे लागते. शैक्षणिक वर्षाच्या प्रारंभी सर्व पुस्तके मुलांना उपलब्ध करून द्यावी लागतात. मंडळाकडून प्रतिवर्षी सुमारे बारा कोटी पुस्तकांचे वितरण होते.

### सर्वशिक्षा अभियान

सर्वशिक्षा अभियानांतर्गत राज्यातील इयत्ता पहिली ते आठवीमध्ये शिक्षण घेणाऱ्या अनुदानित व अंशत: अनुदानित शाळांमधील सर्व लाभार्थी विद्यार्थ्यांना शासनामार्फत मोफत पाठ्यपुस्तकांचा पुरवठा केला जातो. त्याअंतर्गत जिल्हा परिषदांनी नोंदवलेल्या मागणीप्रमाणे पाठ्यपुस्तकांचा पुरवठा मंडळाच्या विभागीय भांडारांतून शाळा सुरू होण्यापूर्वी केला जातो. या पुरवठ्यापोटी येणारी रक्कम महाराष्ट्र राज्य प्राथमिक शिक्षण परिषद, मुंबई यांच्यामार्फत मंडळास दिली जाते. या योजनेअंतर्गत सुमारे तेरा कोटी पुस्तकांचे वितरण होते.

**पुस्तकपेढी योजना**

महाराष्ट्र शासनाच्या नियमित पुस्तकपेढी व १०३ विकास गट योजनेअंतर्गत (प्राथमिक व माध्यमिक), शासनाने केलेल्या तरतुदींच्या आधारे जिल्हा परिषदांनी नोंदवलेल्या मागणीपोटी पुस्तकांचा पुरवठा पाठ्यपुस्तक मंडळाच्या विभागीय भांडारांमधून उधारीने केला जातो. जिल्हा परिषदेकडून या पुस्तकांचा पुरवठा गरीब व गरजू विद्यार्थ्यांना केला जातो. या पुरवठ्यापोटी खरेदीची रक्कम शिक्षण संचालनालयामार्फत पाठ्यपुस्तक मंडळास दिली जाते.

**मंडळाची पाठ्येतर पुस्तके**

इयत्ता पहिली ते आठवी कला, शारीरिक शिक्षण, कार्यानुभव, माहिती व तंत्रज्ञान इत्यादी हस्तपुस्तिका तसेच उत्तम संस्कार कथा भाग १ ते ३, किशोर निवडक कथा/काव्यसंग्रह, माझे जीवन माझी बाळं, मागोवा इत्यादी व इतर प्रकाशने तसेच विश्वकोश मंडळाने निर्मिती केलेल्या खंड क्रमांक १ ते १८ तसेच डीव्हीडी संच (खंड १ ते १८) यावर ३०% वटाव दिला जातो.

**कागद खरेदी**

पाठ्यपुस्तक मंडळाला पुस्तकांच्या छपाईसाठी पूर्वी मध्यवर्ती शासनाच्या धोरणानुसार सवलतीच्या दराने कागद उपलब्ध होत असे; परंतु ही सवलत आता बंद करण्यात आली आहे. त्यामुळे मंडळाला पुस्तक छपाईसाठी आवश्यक असलेला कागद आता खुल्या बाजारातून विहित पद्धतीने अखिल भारतीय स्तरावर थेट उत्पादकांकडून जाहीर निविदा मागवून खरेदी करावा लागत आहे.

**९. संगणक विभाग**

**(अ) मंडळाची वेबसाइट**

पाठ्यपुस्तक मंडळाची संपूर्ण माहिती असलेली **www.balbharati.in** या नावाची स्वत:ची इंटरनेट वेबसाईट तयार करण्यात आली असून, मंडळाशी संबंधित माहिती या वेबसाइटवर उपलब्ध आहे.

**(ब)** मंडळाच्या कामकाजात संगणकाचा उपयोग करून घेण्याबाबतचे धोरण मान्य झाल्यानुसार मंडळातील सर्व कार्यालयीन कामकाजाचे संगणकीकरण करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली. त्यासाठी सन १९९६-९७ मध्ये संगणक विभागाची निर्मिती करण्यात आली व त्याकरिता प्रोग्रॅमर यांची नियुक्ती करून मंडळाच्या कार्यालयीन कामकाजाचे संगणकीकरण करण्याची कार्यवाही सुरू करण्यात आली.

याच विभागामार्फत सर्व संगणकीकरण प्रक्रियेतील बाबी हाताळण्यात येतात व मंडळाच्या सर्व विभागांना तांत्रिक साहाय्य दिले जाते.

आजपर्यंत मंडळाच्या खालील विभागांचे कामकाज संगणकीकृत करण्यात आलेले आहे.

(१) पाठ्यपुस्तक वितरण

(२) विभागीय कार्यालये

(३) पाठ्यपुस्तक निर्मिती, प्रभादेवी कार्यालय

(४) पाठ्यपुस्तक निर्मिती, (मुद्रा-डी.टी.पी. विभाग)

(५) नकाशा विभाग

(६) अर्थ शाखा

(७) ग्रंथालय
(८) आस्थापना विभाग
(९) विद्या विभाग
(१०) टंकलेखन विभाग (मराठी/इंग्रजी)

**(क)** मंडळाचे मुख्यालय, नियंत्रक कार्यालय व ९ भांडारांतील कामकाजामध्ये संगणकाचा वापर मोठ्या प्रमाणात केला जातो. त्यासाठी आवश्यक असणारी अत्याधुनिक संगणक यंत्रणा कार्यान्वित करण्यात आली असून, नवीन तंत्रज्ञानाचा वापर करून संगणक कार्यप्रणाली विकसित करून घेण्यात आली असून त्याचा वापर मंडळात मोठ्या प्रमाणात केला जातो.

तसेच मंडळाचे मुख्यालय, नियंत्रक कार्यालय व सर्व भांडारे इंटरनेटच्या माध्यमातून जोडण्याची कार्यवाही सुरू आहे. यामुळे मुख्यालयात आवश्यक असणारी माहिती तात्काळ उपलब्ध होऊ शकणार आहे.

## १०. मंडळाचे ग्रंथालय

मंडळाचे अतिशय समृद्ध व अद्ययावत असे संदर्भ ग्रंथालय आहे. या ग्रंथालयात मराठी, हिंदी, इंग्रजी, उर्दू, सिंधी, कन्नड, गुजराती, तेलुगु अशी एकूण आठ भाषांतील सर्व विषयांची पुस्तके आहेत. त्यात काही दुर्मिळ पुस्तके आहेत. तसेच १०० ते १५० वर्षांपूर्वीची पाठ्यपुस्तके आहेत. त्याशिवाय भारतातील विविध राज्यांतील आणि परदेशांतील क्रमिक पुस्तकेही आहेत. याशिवाय निरनिराळ्या प्रकारचे नकाशे, तक्ते, चित्रे यांचाही संग्रह आहे. तसेच रिस्ट्रिक्टेड, अनरिस्ट्रिक्टेड मॅप्स आहेत आणि रिलीफ मॅप्स आहेत. ग्रंथालयात निरनिराळ्या विषयांची, वरील आठ भाषांतील देशी व परदेशी अशी जवळ जवळ १६५ नियतकालिके वर्गणी भरून घेतली जातात आणि १५ ते २० नियतकालिके भेट म्हणून येतात. ग्रंथालयात सर्व भाषांतील, सर्व विषयांचे विविध प्रकारचे ज्ञानकोश, विश्वकोश व शब्दकोश असून हा विभाग अत्यंत समृद्ध आहे. दरवर्षी निर्माण होणाऱ्या पाठ्यपुस्तकांच्या निर्मितीसाठी संबंधित समित्यांना, लेखकांना आवश्यक ते संदर्भसाहित्य या ग्रंथालयातून पुरवले जाते. निरनिराळे संशोधकसुद्धा या ग्रंथालयाचा उपयोग नियमितपणे करतात. या ग्रंथालयात एकूण एक लाख सात हजार पुस्तके उपलब्ध आहेत. ग्रंथालयाचे कामकाज संगणकाद्वारे चालते.

## ११. 'किशोर' मासिक

महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक मंडळाने मराठी भाषिक विद्यार्थ्यांची ज्ञान आणि मनोरंजनाची गरज भागवण्यासाठी नोव्हेंबर १९७१ साली बालदिनाच्या सुमुहूर्तावर 'किशोर' मासिकाच्या निर्मितीला प्रारंभ केला. मासिकाच्या ३५ वर्षांच्या वाटचालीत बालमासिकाच्या क्षेत्रातील एक अग्रेसर मासिक म्हणून आज 'किशोर'ची ओळख आहे. कथा, कविता, व्यंग्यचित्रे, विज्ञानविषयक लेखन व माहिती, विनोद, क्रीडा, खेळ, छंद असे विविध प्रकारचे साहित्य किशोरमधून प्रसिद्ध केले जाते.

किशोर मासिकाच्या दिवाळी अंकांना राष्ट्रीय व राज्यस्तरीय स्पर्धांत आतापर्यंत उत्कृष्ट बालमासिक गटातील ३५ पारितोषिके मिळाली आहेत. त्यातील खालील तीन उल्लेखनीय आहेत.

(१) किशोर, मार्च १९७३ - माहिती व नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार, छपाई आणि सजावट राजपुरस्कार - श्रेष्ठता प्रमाणपत्र.

(२) किशोर नोव्हेंबर, १९७६ – माहिती व नभोवाणी मंत्रालय, भारत सरकार, छपाई आणि सजावट राजपुरस्कार – प्रथम पुरस्कार.

(३) किशोर, दिवाळी २००३ – मुंबई मराठी पत्रकार संघ, मुंबई, उत्कृष्ट संपादन– केशवराव कोठावळे पुरस्कार.

मंडळाने सुभाषचंद्र बोस, पंडित नेहरू यांच्या जन्मशताब्दीवर्षानिमित्त, तसेच भारतीय स्वातंत्र्याची पन्नास वर्षे अशा प्रसंगानुरूप 'किशोर'च्या विशेषांकांची निर्मिती केली आहे. कारगिल युद्धाच्या पार्श्वभूमीवर ऑगस्ट १९९९ या महिन्यात 'किशोर'च्या राष्ट्रतेज विशेषांकाचे प्रकाशन मंडळाने केले. या अंकास सर्व स्तरांवरून उत्तम प्रतिसाद मिळाला व अतिशय चांगल्या प्रतिक्रिया व्यक्त करण्यात आल्या.

१९७२–२००७ या ३५ वर्षांच्या वाटचालीत किशोर अंकात प्रसिद्ध झालेल्या उत्कृष्ट साहित्याचे 'निवडक किशोर' या स्वरूपात १४ खंड प्रसिद्ध करण्याचा महत्त्वाकांक्षी प्रकल्प मंडळाने हाती घेतला असून, त्यांपैकी खंड क्रमांक १ (कथा), क्रमांक २ (कविता), क्रमांक ३ (कादंबरिका), क्रमांक ४ (एकांकिका), क्रमांक ५ (दीर्घकथा), क्रमांक ६ (गंमतगाणी), क्रमांक ७ (कादंबरिका भाग २) विक्रीस उपलब्ध आहेत. क्रमांक ८ (ललित), क्रमांक ९ (ललितसृष्टी), क्रमांक १० (छंद) ची छपाई चालू आहे. खंड क्रमांक ११ (विज्ञान), क्रमांक १२ (चरित्र भाग १), क्रमांक १३ (चरित्र भाग २), क्रमांक १४ (देशदेशांतर) प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.

आजमितीला 'किशोर' मासिकाचे दरमहा वितरण सरासरी ६२,००० प्रतींच्या घरात आहे. शासनाने मान्य केलेल्या प्रस्तावानुसार राज्यातील ५४,००० जिल्हा परिषदेच्या प्राथमिक शाळांना किशोर मासिक पाठवण्याची कार्यवाही जानेवारी २००१ पासून करण्यात येत आहे.

❑❑❑

## मंडळाचे मुख्य कार्यालय, विभागीय कार्यालय व सर्व भांडारांचे पत्ते, संबंधित संपर्क अधिकारी यांचे नाव, दूरध्वनी, भ्रमणध्वनी व इ-मेल आयडी

| क्र. कार्यालय | अधिकाऱ्याचे नाव | दूरध्वनी क्रमांक |
|---|---|---|
| **मुख्यालय, पुणे ४.** | **अपिलीय अधिकारी** | |
| १. विद्या विभाग | डॉ. अलका पोतदार<br>विशेषाधिकारी हिंदी | ०२०-२५७१६२०४ मो.<br>मेल - spl_officer_hindi@balbharati.in |
| २. वित्त विभाग | डॉ. अंकुश नवले<br>वित्त व लेखाधिकारी | ०२०-२५७१६३३४ मो. ९४२३००५०९५<br>मेल - fao@balbharati.in |
| ३. प्रशासन विभाग व इतर सर्व विभाग | डॉ. अंकुश नवले<br>वित्त व लेखाधिकारी | ०२०-२५७१६३३४ मो. ९४२३००५०९५<br>मेल - fao@balbharati.in |
| ४. वितरण विभाग व सर्व भांडारे | श्री. दत्तात्रय केत<br>प्र. व्यवस्थापक साठा व वितरण | ०२०-२५७१६३५० मो.९४२३००५०९४<br>मेल - msd@balbharati.in |
| **मुख्यालय, पुणे ४.** | **माहिती अधिकारी** | |
| १. विद्या विभाग | डॉ. अजयकुमार लोळगे<br>विशेषाधिकारी कार्यानुभव | ०२०-२५७१६२०७ मो.<br>मेल- spl_officer_work_exp@balbharati.in |
| २. वित्त विभाग व इतर सर्व विभाग | श्रीमती नीलीमा नाईक<br>प्र. विधी अधिकारी | ०२०-२५७१६३०७ मो. ९४२३००५०७०<br>मेल- law_officer@balbharati.in |
| ३. प्रशासन विभाग | श्री. जालिंदर भापकर<br>प्र. कार्यालय सचिव | ०२०-२५७१६१३७ मो. ९४२३००५०८८<br>मेल- office_secretary@balbharati.in |
| ४. वितरण विभाग व इतर सर्व भांडारे | श्रीमती हमीदा सय्यद<br>लेखापाल | ०२०-२५७१६१०९ मो.<br>मेल- amsd@balbharati.in |
| **मुख्यालय, पुणे ४.** | **सहायक माहिती अधिकारी** | |
| | श्री. रवींद्र पवार<br>कार्यालय अधीक्षक | ०२०-२५७१६१०६ मो.<br>मेल- office_sup_admin@balbharati.in |
| **नियंत्रक कार्यालय** | | |
| **अपीलीय अधिकारी** | श्री. विवेक गोसावी<br>नियंत्रक | ०२२-२४२१८००२ मो. ९४२३००५०८२<br>मेल- controller@balbharati.in |
| **माहिती अधिकारी** | श्री. सच्चिदानंद आफळे<br>मुख्य निर्मिती अधिकारी | ०२२-२४२१८००२ मो. ९४२३००५०९०<br>मेल- cpo@balbharati.in |

| विभागीय कार्यालय व भांडारे | माहिती अधिकारी | सहायक माहिती अधिकारी |
|---|---|---|
| २. नियंत्रक, महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती मंडळ, पु. ल. देशपांडे कला अकादमी, रविंद्र नाट्य मंदिर, सयानी रोड, प्रभादेवी, मुंबई-४०० ०२५.<br>दूरध्वनी क्रमांक ०२२-२४२१८००२<br>मो. ९४२३००५०९०<br>मेल - controller@balbharati.in | श्री. सचिदानंद पुरुषोत्तम आफळे<br>मुख्य निर्मिती अधिकारी | |
| ३. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र 'बालभारती', सेनापती बापट रोड, पुणे-४११ ००४.<br>दूरध्वनी क्र. ०२०-२५६५९४६५<br>मो. ९४२३००५०७०<br>मेल - dm_pune@balbharati.in | श्रीमती नीलिमा प्रमोद नाईक<br>भांडार व्यवस्थापक | श्री. विनोद पांडुरंग अस्मर<br>सहायक भांडार व्यवस्थापक |
| ४. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र, १० उद्योगनगर, एस. व्ही. रोड, गोरेगाव (पश्चिम) मुंबई ४०० ०६२<br>दूरध्वनी क्र. ०२२-२८७७१८४२<br>मो. ९४२३००५०७१<br>मेल - dm_goregaon@balbharati.in | श्री. अजय भिकू यादव<br>भांडार व्यवस्थापक | श्री. संजय पांडुरंग कोलते<br>सहायक भांडार व्यवस्थापक |
| ५. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र 'बालभारती', रवींद्रनाथ टागोर रोड, सायन्स कॉलेजसमोर, महाराजाबागशेजारी, नागपूर-४४० ०१२.<br>दूरध्वनी क्रमांक ०७१२-२५४७७१६,<br>०७१२-२५२३०७८<br>मो. ९४२३००५०७२<br>मेल - dm_nagpur@balbharati.in | श्री. किशोर पाटणकर<br>प्र. भांडार व्यवस्थापक | श्री. गौतम कसबे<br>भांडार अधीक्षक (पुस्तके) |
| ६. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र, 'बालभारती' एम.आय.डी.सी. शेड नं. २ व ३, रेल्वे स्टेशनजवळ, औरंगाबाद-४३१ ००५.<br>दूरध्वनी क्रमांक ०२४०-२३३२१७१<br>मो. ९४२३००५०७३<br>मेल - dm_aurangabad@balbharati.in | श्री. भागवत नारायण पुरी<br>भांडार व्यवस्थापक | श्री. तानाजी मारुती सुपे<br>सहायक भांडार व्यवस्थापक |

| विभागीय कार्यालय व भांडारे | माहिती अधिकारी | सहायक माहिती अधिकारी |
|---|---|---|
| ७. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र, 'बालभारती', सिडको प्लॉट क्र.१४, डब्ल्यू सेक्टर १२, (पश्चिम), वावंजा रोड, न्यू पनवेल, जि. रायगड, पनवेल-४१० २०६. दूरध्वनी क्रमांक ०२२-२७४६२६४५ मो. ९४२३००५०७८ मेल - dm_panvel@balbharati.in | श्रीमती उमा उदय कुर्तकोटी भांडार व्यवस्थापक | श्रीमती नयन प्रसाद कलकर्णी सहायक भांडार व्यवस्थापक |
| ८. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र, 'बालभारती', लेखानगरजवळ, सिडको, नवीन मुंबई-आग्रा रोड, नाशिक-४२२ ००९. दूरध्वनी क्रमांक ०२५३-२३९१५११ मो. ९४२३००५०७४ मेल - dm_nashik@balbharati.in | श्री. लक्ष्मण यशवंत डामसे भांडार व्यवस्थापक | श्री. प्रकाश मालाजी बागुल सहायक भांडार व्यवस्थापक |
| ९. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र, 'बालभारती', पी-४१, औद्योगिक वसाहत, मुंबई-बंगलोर महामार्ग, सकाळ कार्यालयासमोर, कोल्हापूर-४१६ ००५. दूरध्वनी क्रमांक ०२३०-२४६८५७६ मो. ९४२३००५०७६ मेल - dm_kolhapur@balbharati.in | श्री. दत्तात्रय कृष्णाजी केत भांडार व्यवस्थापक | श्री. माणिकराव नानासाहेब पाटील प्र. सहायक भांडार व्यवस्थापक |
| १०. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र, 'बालभारती', प्लॉट नं. एफ ९१, एम.आय.डी.सी., लातूर-४१३ ५३१ दूरध्वनी क्रमांक ०२३८२-२२०९३० मो. ९४२३००५०७५ मेल - dm_latur@balbharati.in | श्री. दीपक पवार प्र. भांडार व्यवस्थापक | श्री. एन. पी. पडोळ भांडार अधीक्षक (पुस्तके) |
| ११. महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र, 'बालभारती', शाकुंतल कॉलनी,, व्ही. एम. व्ही कॉलेजच्या मागे, अमरावती-४४४ ६०४. दूरध्वनी क्रमांक ०७२१-२३०९६५ ०७१२-२५३१७४९ मो. ९४२३००५०७७ मेल - dm_amaravati@balbharati.in | श्री. प्रकाश शिंदे प्र. भांडार व्यवस्थापक | श्री. दिलीप चव्हाण भांडार अधीक्षक (पुस्तके) |

## महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे.

## लोकाभिमुख प्रशासन नागरी सनद व माहिती पुस्तिका

| | | |
|---|---|---|
| **नागरी सनद-१** | - | अधिकृत पुस्तक विक्रेते, प्राथमिक/माध्यमिक शिक्षण संस्था, शाळा, आदिवासी कल्याण आश्रमशाळा यांना मंडळाचे अधिकृत पुस्तक विक्रेते/अधिकृत शैक्षणिक संस्था म्हणून मान्यता व नोंदणी क्रमांक देणे. |
| **१. सेवेचे नाव** | - | मंडळाच्या विभागीय भांडारांतून अधिकृत पुस्तक विक्रेते, प्राथमिक/माध्यमिक शिक्षण संस्था/शाळा, आदिवासी कल्याण आश्रमशाळा यांना मंडळाचे अधिकृत पुस्तक विक्रेते/ अधिकृत शैक्षणिक संस्था म्हणून मान्यता व नोंदणी क्रमांक देणे. |
| **२. आवश्यकता** | - | मंडळाच्या विभागीय भांडारांतून विविध पुस्तक विक्रेते, प्राथमिक शाळा, माध्यमिक शाळा/शिक्षण संस्था, आदिवासी कल्याण आश्रमशाळा, पुस्तक विक्रेते यांनी मंडळाची पाठ्यपुस्तके १५% वटावासह वेळेत मिळण्यासाठी, तसेच या शैक्षणिक संस्थांना वटाव दराची रक्कम तात्काळ मिळण्यासाठी या पुस्तक विक्रेते/शैक्षणिक संस्था यांनी मंडळाच्या विभागीय भांडारांत अधिकृत पुस्तक विक्रेते/शैक्षणिक संस्था म्हणून नोंदणी करणे आवश्यक असते. |
| **३. कोणत्या मंडळाच्या नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते.** | - | पाठ्यपुस्तक मंडळ अधिनियम सुधारित नियमावलीतील १८(५) अनुसार. |
| **४. कोणत्या भांडाराशी संपर्क साधावा.** | - | पुणे/मुंबई (बोरिवली)/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/लातूर/ अमरावती/ कोल्हापूर/पनवेल (नवी मुंबई) येथील मंडळाच्या विभागीय भांडारांतील भांडार व्यवस्थापक यांच्याशी. |
| **५. अर्जासोबत जोडायची कागदपत्रे.** | - | पाठ्यपुस्तक मंडळ सुधारित नियमावली (१ एप्रिल, २००४ पासून) नियम व अटीनुसार, मंडळाच्या विभागीय भांडारांतून आवश्यक ते शुल्क, मुदत ठेव पावतीसह खालील मूळ कागदपत्रांची पूर्तता करावी. शैक्षणिक संस्था/आदिवासी कल्याण आश्रमशाळा/शासकीय संस्था/महानगरपालिका/ महानगरपरिषद/ग्रामपंचायत/जिल्हा परिषद शाळा/संस्था इत्यादींसाठी अधिकृत शैक्षणिक संस्था म्हणून मंडळाच्या विभागीय भांडारांत केव्हाही नोंदणी करता येते. पुस्तक विक्रेते यांच्यासाठी 'अधिकृत पुस्तक विक्रेता' म्हणून नोंदणी करण्यासाठीचा कालावधी १ सप्टेंबर ते ३१ मार्च असा आहे. यासाठी करायचा अर्ज त्या त्या भांडारांत २ प्रतींत उपलब्ध आहे. त्यासोबत खालील कागदपत्रे जोडणे आवश्यक आहे. |

१. शॉप ॲक्टचे प्रमाणपत्र (सध्याचे).
२. दुकानाची जागा स्वत:च्या नावावर असल्याबाबतची सर्व कागदपत्रे.
३. मंडळाकडून प्राप्त झालेला विहित नमुन्यातील अर्ज (दोन प्रतींत).
४. शहर, गाव, महानगर येथील गावात/शहरात कायम रहिवासी असल्यासंदर्भातील आवश्यक ती सर्व कागदपत्रे.
५. अर्जासोबत रु.१००/- (अक्षरी रुपये शंभर फक्त) कोर्टाच्या स्टँम्पवर मंडळाचे अधिकृत पुस्तक विक्रेते म्हणून प्रसृत केलेली नियमावली मान्य असल्याचे प्रतिज्ञापत्र.
६. अधिकृत पुस्तक विक्रेता नोंदणी शुल्क रु.१०००/- (अक्षरी रुपये एक हजार फक्त) जमा केल्याची पावती.
७. आपण एखाद्या पुस्तक विक्रेत्या संघटनेचे सभासद असाल तर त्या संघटनेचे नाव/पत्ता.
८. भागीदारीत संस्था असेल तर भागीदारांची नावे, पत्ते, भागीदारीची प्रमाणित केलेली खरी नक्कलप्रत व पार्टनरशिप प्राप्त नोंदणी क्रमांक.

**६. अर्ज कोठे सादर करावा.** - विभागीय भांडारांतील भांडार व्यवस्थापक, पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र, पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई(गोरेगाव)/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/पनवेल.

**७. अर्जात त्रुटी नसल्यास सेवा मिळण्याचा कालावधी.** - ४५ दिवस

**८. विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा.** - मा. संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, ‘बालभारती’, सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ००४.

## महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे.

## लोकाभिमुख प्रशासन नागरी सनद व माहिती पुस्तिका

**नागरी सनद-२** - अधिकृत पुस्तक विक्रेते, प्राथमिक/माध्यमिक शाळा, शिक्षण संस्था, दुर्गम भागांतील शाळा, आदिवासी कल्याण आश्रमशाळा इत्यादी संस्था मंडळाची पाठ्यपुस्तके घेतात. त्या पुस्तकांतून काही प्रतींमध्ये मुद्रणदोष/बांधणीदोष आढळतात. अशा प्रती स्वीकारून संबंधितांना उत्तम छपाईच्या निर्दोष प्रती विनामोबदला त्वरित बदलून देणे.

**१. सेवेचे नाव** - मंडळाच्या विभागीय भांडारांतून अधिकृत पुस्तक विक्रेते, दुर्गम भागांतील शाळा, प्राथमिक माध्यमिक शाळा, शिक्षण संस्था, आदिवासी कल्याण आश्रमशाळा यांना मंडळाच्या अधिकृत पाठ्यपुस्तकांची विक्री करण्यात आल्यानंतर जर त्या पाठ्यपुस्तकांमध्ये बांधणीदोष/मुद्रणदोष आढळल्यास सदर पुस्तकांच्या प्रती परत घेण्यात येऊन संबंधितांना उत्तम छपाईच्या निर्दोष प्रती विनामोबदला बदलून देणे.

**२. आवश्यकता** - मंडळाच्या विभागीय भांडारांतून अधिकृत पुस्तक विक्रेते, प्राथमिक/माध्यमिक शाळा, शिक्षण संस्था, आदिवासी कल्याण आश्रमशाळा यांना पाठ्यपुस्तक मंडळाच्या अधिकृत क्रमिक पुस्तकांची विक्री केल्यानंतर त्यांतील काही प्रती सदोष असू शकतात. विक्रेत्यांकडून अशा सदोष प्रती विद्यार्थी-पालक, शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधी यांच्याकडे जातात. अशी सदोष पुस्तके विद्यार्थ्यांना वापरण्यास उपयुक्त ठरत नाहीत. त्यामुळे पालकांना नवीन पाठ्यपुस्तके विकत घेण्यासाठी विनाकारण आर्थिक भुर्दंड पडतो. अशा प्रकारची पुस्तके विनामोबदला व त्वरित बदलून देणे, ही मंडळाच्या ध्येय-धोरणात नमूद करण्यात आलेली बाब आहे. त्यामुळे पालकांना नवीन पुस्तके खरेदीचा भुर्दंड बसत नाही. ज्या विक्रेत्याकडून अशा प्रती विकत घेतल्या गेल्या असतील त्या त्याने ग्राहकांना बदलून देणे, बंधनकारक आहे. तरीही अशशा प्रती त्यांच्याकडून बदलून न मिळाल्यास मंडळाच्या भांडारांमधून ग्रहाकांना अशा प्रती दिलून दिल्या जातात. जे अधिकृत पुस्तक विक्रेते पुस्तकांच्या सदोष प्रती भांडारात जमा करतील; परंतु त्याऐवजी पुस्तके बदलून नेणार नाहीत, त्यांच्या नावे खराब प्रतींच्या दर्शनी किमतीची माल आवक पावती तयार करून विक्रेत्याच्या खाती निव्वळ रक्कम जमा करण्यात येते.

| | |
|---|---|
| **३. कोणत्या मंडळाच्या नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते.** | – पाठ्यपुस्तक मंडळ अधिनियम सुधारित नियमावलीतील १८(९) अनुसार. |
| **४. कोणाशी संपर्क साधावा.** | – पुणे/मुंबई (गोरेगाव)/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/लातूर/अमरावती/कोल्हापूर/पनवेल (नवी मुंबई) येथील मंडळाच्या विभागीय भांडारांतील भांडार व्यवस्थापक यांच्याशी संपर्क साधावा. |
| **५. अर्ज कसा करावा/ त्यासोबत कोणती कागदपत्रे जोडावीत.** | – अर्ज संबंधित भांडार व्यवस्थापक यांच्या नावे लिखित स्वरूपात करावा, त्यासोबत पुस्तक खरेदीच्या पावतीची झेरॉक्स व सदोष प्रतींबाबतचा तपशील द्यावा. चुकीच्या पुस्तकांच्या पुरवठ्याबाबत तक्रारी, पुरवठा केलेल्या दिनांकापासून २१ दिवसांत स्वीकारण्यात येतील. |
| **६. अर्ज कोठे सादर करावा.** | – विभागीय भांडारांतील भांडार व्यवस्थापक, पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र, पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई(गोरेगाव)/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/पनवेल. |
| **७. सेवा मिळण्याचा कालावधी** | – १ एप्रिल ते ३१ मार्च या कालावधीत विकलेल्या काही प्रतींमध्ये जर मुद्रणदोष/बांधणीदोष आढळून आल्यास अशा सदोष प्रती अधिकृत पुस्तक विक्रेते/शैक्षणिक संस्था/पालक व विद्यार्थी यांना संबंधित भांडारातील पुस्तक विक्रीचा हंगाम कालावधी संपल्यांनतर १५ दिवसांत कामकाजाच्या दिवशी कार्यालयीन वेळेत भांडारांतून बदलून दिल्या जातील. |
| **८. विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा.** | – मा. संचालक<br>महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे–४११ ००४. |

## महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे.

## लोकाभिमुख प्रशासन नागरी सनद व माहिती पुस्तिका

**नागरी सनद-३** – अधिकृत पुस्तक विक्रेते, प्राथमिक/माध्यमिक शाळा, शिक्षण संस्था/शाळा, आदिवासी कल्याण आश्रम शाळा यांना पाठ्यपुस्तके वेळेत उपलब्ध करून देताना दर्जेदार पाठ्यपुस्तकांची निर्मिती केली जाते. तसेच पाठ्यपुस्तकांच्या किमती सर्वसामान्य अल्प व खेड्यातील गरीब पालकांना/विद्यार्थ्यांना परवडतील अशा ठेवणे मंडळास क्रमप्राप्त ठरते. कमीत कमी एका प्रतीपासून जास्तीत जास्त कितीही प्रतींमध्ये पाठ्यपुस्तकांची विक्री केली जाते.

**१. सेवेचे नाव** – मंडळाच्या विभागीय भांडारांतून अधिकृत पुस्तक विक्रेते, प्राथमिक/माध्यमिक शाळा, शिक्षण संस्था/शाळा, आदिवासी कल्याण आश्रम शाळा, शिक्षक, पालक व विद्यार्थी यांना सर्वोत्तम दर्जाची पाठ्यपुस्तके वेळेत तसेच रास्त किमतीत उपलब्ध करून देणे क्रमप्राप्त आहे. 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर पुस्तके उपलब्ध करून देणे जरुरीचे आहे. महाराष्ट्र राज्यातील इयत्ता पहिली ते आठवीच्या सर्व मुलांमुलींना शिक्षणासाठी आठ भाषांतील दर्जेदार पाठ्यपुस्तके वेळेत उपलब्ध करून दिली जातात. इयत्ता ९ वी ते १२ वीची पाठ्यपुस्तके छापून वितरित केली जातात.

**२. आवश्यकता** – मंडळाच्या विभागीय भांडारांतून विविध पुस्तके प्राथमिक/माध्यमिक शाळा, शिक्षण संस्था, आदिवासी आश्रमशाळा यांना उत्तम दर्जाची व रास्त किमतीत पुस्तके मिळणे गरजेचे आहे. ग्रामीण भागांतील पालक/विद्यार्थी/शैक्षणिक संस्थांना ही पुस्तके सुलभतेने विकत घेता आली पाहिजेत, अशा दृष्टीने पाठ्यपुस्तकांचा दर्जा उत्तम प्रतीचा व किंमत रास्त ठेवणे योग्य ठरते.

**३. कोणत्या मंडळाच्या नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते.** – पाठ्यपुस्तक मंडळाचे कामकाज 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर चालते.

**४. कोणत्या भांडाराशी संपर्क साधावा.** – पुणे/मुंबई (गोरेगाव)/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/लातूर/अमरावती/कोल्हापूर/पनवेल (नवी मुंबई) येथील मंडळाच्या विभागीय भांडारांतील भांडार व्यवस्थापक यांच्याशी संपर्क साधावा.

**५. अर्ज कसा करावा/अर्ज किती प्रतींत करावा.** – संबंधित भांडारात छापील अर्ज उपलब्ध आहे. तो दोन प्रतींत सादर करावा.

| | | |
|---|---|---|
| **६. अर्ज कोठे सादर करावा.** | - | विभागीय भांडारांतील भांडार व्यवस्थापक, पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र, पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई(गोरेगाव)/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/पनवेल. |
| **७. सेवा मिळण्याचा कालावधी.** | - | पुस्तकांच्या उपलब्धतेनुसार त्वरित. |
| **८. विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा.** | - | मा. संचालक<br>महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ००४. |

## महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे.

## लोकाभिमुख प्रशासन नागरी सनद व माहिती पुस्तिका

**नागरी सनद-४** - प्राथमिक/माध्यमिक शाळा, शिक्षण संस्था, आदिवासी कल्याण आश्रम शाळा, अधिकृत पुस्तक विक्रेते यांना पाठ्यपुस्तकांच्याप्रमाणेच अनेक शिक्षणोपयोगी पूरक साहित्य उपलब्ध करून दिले जाते. त्यामध्ये पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त पुस्तके विद्यार्थ्यांसाठी उपलब्ध करून दिली जातात. त्याचप्रमाणे कला, कार्यानुभव, शारीरिक शिक्षण या विषयांच्या शिक्षक हस्तपुस्तिका उपलब्ध करून दिल्या जातात. सर्व पाठ्येतर साहित्यही उत्तम दर्जाचे व निर्दोष असावे असा प्रयत्न केला जातो.

**१. सेवेचे नाव** - प्राथमिक/माध्यमिक शाळा, शिक्षण संस्था, आदिवासी कल्याण आश्रम शाळा, अधिकृत पुस्तक विक्रेते यांना पाठ्यपुस्तकांच्या हस्तपुस्तिका व पूरक साहित्य उपलब्ध करून देणे.

**२. आवश्यकता** - प्राथमिक/माध्यमिक शाळा, शिक्षण संस्था, आदिवासी कल्याण आश्रम शाळा, अधिकृत पुस्तक विक्रेते यांना पाठ्यपुस्तकांप्रमाणेच पाठ्येतर पुस्तके, शिक्षक हस्तपुस्तिका उपलब्ध करून दिल्याने शिक्षकांना हस्तपुस्तिकेवरून विषय शिकवणे सुलभ जाते.

**३. कोणत्या मंडळाच्या नियमाप्रमाणे कार्यवाही केली जाते.** - पाठ्यपुस्तक मंडळ अधिनियम सुधारित नियमावलीनुसार.

**४. कोणाशी संपर्क साधावा.** - पुणे/मुंबई (गोरेगाव)/नागपूर/औरंगाबाद/नाशिक/लातूर/अमरावती/कोल्हापूर/पनवेल येथील मंडळाच्या विभागीय भांडारांतील भांडार व्यवस्थापक यांच्याशी संपर्क साधावा.

**५. अर्ज कसा करावा/अर्ज किती प्रतींत करावा.** - त्या त्या विभागीय भांडार व्यवस्थापकांच्या नावे लिखित स्वरूपातील अर्ज दोन प्रतींत सादर करावा.

**६. अर्ज कोठे सादर करावा.** - विभागीय भांडारांतील भांडार व्यवस्थापक, पाठ्यपुस्तक भांडार व वितरण केंद्र, पुणे/नागपूर/औरंगाबाद/मुंबई(गोरेगाव)/कोल्हापूर/अमरावती/नाशिक/लातूर/पनवेल.

**७. सेवा मिळण्याचा कालावधी.** - मागणीपत्रकात नमूद केलेल्या पाठ्येतर पुस्तकांच्या उपलब्धतेनुसार त्वरित पुरवठा केला जातो.

**८. विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा.** - मा. संचालक
महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे-४११ ००४.

**महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ,**
**'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे.**

## लोकाभिमुख प्रशासन नागरी सनद व माहिती पुस्तिका

**नागरी सनद-५** - प्राथमिक/माध्यमिक शाळा, शिक्षण संस्था, आदिवासी कल्याण आश्रम शाळा, अधिकृत पुस्तक विक्रेते व विद्यार्थी यांना पाठ्यपुस्तकांप्रमाणेच पाठ्येतर साहित्यही उपलब्ध करून दिले जाते. त्यापैकी एक 'किशोर' मासिक आहे. बालमासिकांच्या क्षेत्रातील एक अग्रेसर मासिक म्हणून किशोरची ओळख आहे. मराठी भाषिक विद्यार्थ्यांची ज्ञान आणि मनोरंजनाची गरज भागवण्याबरोबरच त्यांना अवांतर वाचनाची गोडी लागावी, त्यांचा व्यक्तिमत्त्व विकास व्हावा यासाठी किशोर मासिक अल्प किमतीत 'ना नफा ना तोटा' या तत्त्वावर उपलब्ध करून दिले जाते.

**१. सेवेचे नाव** - किशोर मासिकात संस्कारक्षम व मनोरंजक कथा, कविता, एकांकिका, आरोग्य, विज्ञान, पर्यावरणविषयक माहिती, थोरांची चरित्रे, आत्मचरित्रे, सामान्य ज्ञान-कोडी, निरनिराळे छंद, क्रीडा, महिन्यातील प्रासंगिक माहिती असे विविध प्रकारचे साहित्य प्रकाशित केले जाते. त्याबरोबरच इयत्ता एक ते चार या प्राथमिक शालेय गटासाठी १६ पानांचा स्वतंत्र बालविभाग असतो. त्यात मुलांमधील निर्मिती क्षमतेला - लेखन व चित्रकलेला - वाव देण्यासाठी काही सदरे देण्यात येतात. त्यामध्ये मुलांचे साहित्य व चित्रे प्रकाशित केली जातात.

विद्यार्थ्यांना आवडतील अशी चित्रे, कोडी, विनोद, खेळ यांचा समावेश किशोरमध्ये असल्याने बालगटातील मुलांपासून किशोर गटातील मुले, तसेच शिक्षक व पालकांनाही या मासिकाच्या वाचनाने ज्ञान, माहिती व आनंद मिळतो. संपूर्ण अंक चार रंगी असतो. उत्तम दर्जाची बांधणी असते. दर महिन्याच्या अंकाची किंमत रु.७/- आहे व वार्षिक वर्गणी रु.८०/- आहे. वार्षिक वर्गणीत दिवाळी अंकाचा समावेश असतो. निवडक किशोर खंड १ ते ७ किंमत रु. १००/- ८ ते १४ प्रकाशनाच्या वाटेवर आहेत.

**२. आवश्यकता** - प्राथमिक व माध्यमिक गटातील सर्व विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकांव्यतिरिक्त अवांतर वाचनासाठी किशोर मासिक प्रकाशित केले जाते. मासिकातील अनेक सदरे अशी आहेत, की ज्यामुळे विद्यार्थ्यांच्या व इतर वाचकांच्या सामान्य ज्ञानात नक्कीच भर पडते. विद्यार्थ्यांची वैचारिक पातळी, आकलनक्षमता व ज्ञान वाढण्यासाठी किशोरमधील साहित्याचा

| | | |
|---|---|---|
| | | उपयोग होतो. ऐतिहासिक व आधुनिक गोष्टींची माहिती, वर्तमानातील घडामोडींचीही माहिती त्यात दिली जाते. त्यामुळे विद्यार्थ्यांना वाचनाची गोडी लागते. तसेच विद्यार्थ्यांचे साहित्य व चित्रे त्यात प्रकाशित केली जात असल्याने त्यांच्यात लेखनाची व चित्रकलेचीही आवड निर्माण होते. मुलांचा सर्वांगीण विकास होण्याच्या दृष्टीने आवश्यक असे साहित्य किशोर मासिकात प्रकाशित केले जाते. |
| **३. कोणाशी संपर्क साधावा.** | – | मा. संचालक, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे, किंवा<br>प्र. कार्यकारी संपादक, किशोर, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे. |
| **४. अर्ज कसा करावा/अर्ज किती प्रतींत करावा.** | – | मा. संचालक/कार्यकारी संपादिका, किशोर मासिक, पाठ्यपुस्तक मंडळ, पुणे यांच्या नावे लेटरहेडवर २ प्रतीत किशोर मासिक मागविण्यासंबंधीचा अर्ज सादर करावा. किशोर मासिकात काही लेख किंवा माहिती, विनोद प्रकाशित करण्यासाठी पाठवायचे असल्यास ते वरील पत्त्यावर पाठवण्यात यावे. सर्व माहितीची छाननी करून/तपासणी करून योग्य ती माहिती प्रकाशित केली जाते. |
| **५. अर्ज कोठे सादर करावा.** | – | महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे–४११ ००४. |
| **६. सेवा मिळण्याचा कालावधी.** | – | 'किशोर' मासिकासंदर्भात काही सूचना केल्या असतील, तर सूचनांची वेळोवेळी दखल घेण्यात येते व पुढील मासिक प्रकाशित करण्यापूर्वी त्यामध्ये काही त्रुटी राहणार नाहीत याची दखल घेतली जाते. तसेच काही मजकूर/मसुदा/माहिती प्रकाशित करण्यासंबंधी कळवलेले असेल, तर त्याची योग्य प्रकारे छाननी/तपासणी करून योग्य ती माहिती प्रकाशित केली जाते. |
| **८. विहित कालावधीत सेवा न मिळाल्यास तक्रार निवारणासाठी कोणाकडे अर्ज करावा.** | – | मा. संचालक<br>महाराष्ट्र राज्य पाठ्यपुस्तक निर्मिती व अभ्यासक्रम संशोधन मंडळ, 'बालभारती', सेनापती बापट मार्ग, पुणे–४११ ००४. |

❑❑❑